बृहन्मुंबईमहानगरपालिका

(घन कचरा व्यवस्थापन खाते एस विभाग)

क्र. सहा.अभि./घकव्य/9431/एस दि. 12.11.2026

स्वारस्य अभिव्यक्ती

'एस' विभागातील भांडुपेश्वर कुंड, शिवाजी तलाव, पवार वाडी व गणेश घाट पवई या नियमित विसर्जन ठिकाणावर छटपुजा- 2026 कालावधीत एन.जी.ओ. कामगारांमार्फत निर्माल्य गोळा करणे व सभोवतालच्या परिसराची साफसफाई करण्याबाबत.

इच्छुक संस्थांनी याबाबतचा तपशील, अर्जकरीता `एस` विभाग कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर अथवा सहाय्यक अभियंता (घन कचरा व्यवस्थापन) यांचेकडे संपर्क साधावा. सदर अर्जाचा नमुना हा रु. 1000/- + 18% टक्के GST कर भरुन सहाय्यक अभियंता (घकव्य) एस विभाग यांच्या कार्यालयात उपलब्ध होईल.

संस्थेस अर्ज करण्याची मुदत ही दि. 13.11.2026 रोजी दुपारी 02.00 वाजेपर्यंत असून, संस्थेने निविदा अर्ज दि. 13.08.2025 रोजी सायं. 05.00 वाजेपर्यंत जमा करावे. जमा करताना संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र कागदपत्रे व निविदा रक्कम रु. 1000/- + 18% टक्के GSTभरल्याची पावती सादर करणे गरजेचे आहे. अर्धवट तसेच चुकीचे भरलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीतयाची कृपया नोंद घ्यावी. म्हणजेच दि. 13.11.2025 रोजी दुपारी 5.00 वाजेनंतर अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

सदर योजनेची सोडत दिनांक 13.11.2026 रोजी संध्याकाळी 05.30 वाजता सहाय्यक अभियंता (घकव्य) `एस` विभाग यांच्या दालनात घेण्यात येईल. तसेच सदर कामाकरीता एक स्वतंत्र संस्था व एक प्रतिक्षीत संस्था निवडण्यात येईल. सोडतीमध्ये यशस्वी झालेल्या संस्थेचे काम असमाधानकारक वाटल्यास मनपाच्या प्रचलित पध्दतीनुसार प्रतिक्षा यादीतील संस्थेस सदर काम योग्य त्या बाबींचीपुर्तता करण्यासापेक्ष देण्यात येईल.

सदर सोडती करिता सर्व पात्र संस्थेचे अध्यक्ष / उपाध्यक्ष/ खजिनदार यौपकी एक पदाधिकारी उपस्थित राहणे अनिवार्य आहे. याची कृपया नोंद घ्यावी. कोणत्याही संस्थेचे एक पेक्षा जास्त पदाधिकारी यांना सहाय्यक अभियंता (घकव्य) एस विभाग यांच्या दालनात प्रवेश देण्यात येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

सही/-

सहा. अभि. (घ.क.व्य.) `एस` विभाग